## धुळे महानगरपालिका

**विषय :- महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत होर्डींग बाबत**

# जाहिर सुचना

धुळे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व होर्डींग धारक यांना कळविण्यात येते की,धुळे महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत लावणेत आलेले होर्डींग निष्कासित करण्याची महानगरपालिके मार्फत मोहिम हाती घेण्यात येत आहे. यापुर्वी वेळोवेळी अनधिकृत होर्डींग धारक यांना आवश्यक दस्तऐवज उपलब्ध करुन देणे व शुल्क भरणे याबाबत लेखी सूचना देण्यात आल्या आहेत.परंतु अद्यापही अनेक होर्डींग धारक यांनी आवश्यक दस्तऐवज महानगरपालिकेकडे उपलब्ध करुन दिले नाही व शुल्क भरणा करुन होर्डींग अधिकृत / नियमित करुन घेतलेले नाहीत.

यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील सर्व अनधिकृत होर्डींगधारक यांना सुचित करण्यात येते की त्यांनी दि.१५/१२/२०२५ पर्यंत महानगरपालिके कडे सर्व आवश्यक दस्तऐवज सादर करुन आवश्यक शुल्क भरणा करावा. या तारखे पर्यंत अनधिकृत होर्डींग धारकांनी होर्डींग अधिकृत / नियमित न करुन घेतल्यास ते दि.१६/१२/२०२५ पासून अनधिकृत समजून निष्कासित करण्यात येतील.

दिनांक १३/१२/२०२५ व १४/१२/२०२५ या सुट्टीच्या दिवशीही जाहिरात विभागात आपले दस्तऐवज व शुल्क स्विकारले जाईल यांची नोंद घ्यावी.

11.12.2025

**नितीन कापडणीस**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका**